



दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com


**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक




● वर्ष : ०२ ● अंक : ०३८ ● पुणे ● गुरुवार, दि. १९ डिसेंबर २०२४ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




भव्य सामूहिक विवाह सोहळ्याचा उत्सव 3



रविंद्र चव्हाण हे पक्षनिष्ठेचं दुसरं नाव 4

## ठळक बातम्या

### खचलेल्या चेंबरच्या कामाची चौकशी होणार

**पुणे : (आरंभ पर्व)**
जंगली महाराज रस्त्यावर गेल्या 30 वर्षांत एकदाही खड्डा पडलेला नाही. पण, याच रस्त्यावर पाच वर्षांपूर्वी केलेले चेंबर खचून मोठा खड्डा पडला होता. एवढ्या कमी कालावधीत हा चेंबर खचला कसा, याची चौकशी पथ विभागाकडून केली जाणार आहे. पुणे शहरात पावसाळ्यात अनेक रस्त्यांना खड्डे पडतात. पण, महापालिकेने सुमारे 30 वर्षांपूर्वी जंगली महाराज रस्त्याचे काम करताना त्याच्या कामाच्या गुणवत्तेकडे तत्कालीन अधिकाऱ्यांनी लक्ष दिल्याने या रस्त्याला खड्डे पडत नाहीत. पण, गेल्या काही वर्षांपासून जंगली महाराज रस्त्यावर पावसाळ्यात पाणी तुंबण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे महापालिकेने येथील पावसाळी गटारांची क्षमता वाढविणे, नवीन चेंबर बांधण्याचे काम हाती घेतले होते. त्यामुळे यंदाच्या वर्षी पाणी कमी प्रमाणात तुंबले होते. छत्रपती संभाजी महाराज उद्यानाच्या समोरच्या बाजूस जंगली महाराज रस्त्यावर पावसाळी गटाराचे चेंबर खचले होते. मनसेचे कार्यकर्ते प्रशांत कनोजिया यांनी यासंदर्भात महापालिकेकडे तक्रार केली. अधिकाऱ्यांनी तपासणी केली असता तेथे मोठे भगदाड पडण्याची शक्यता होती. पण, हा प्रकार वेळीच लक्षात आल्याने मोठा अपघात होण्यापासून वाचला आहे. जंगली महाराज रस्त्यावर हा चेंबर सुमारे 5 वर्षांपूर्वी केलेला आहे. पण, तो एवढ्या लवकर कसा काय खचला, मोठी पोकळी कशी निर्माण झाली, याची चौकशी केली जाईल. संबंधित ठेकेदार आणि अभियंत्यांवर जबाबदारी निश्चित केली जाईल.



# प्रवासी बोटीला जलसमाधी

## नौदलाच्या ‘स्पीड बोटी’ची धडक; १३ मृत्युमुखी

**मुंबई : (दै. आरंभ पर्व)**
‘गेट वे ऑफ इंडिया’ येथून घारापुरीकडे निघालेल्या प्रवासी बोटीला नौदलाच्या ‘स्पीड बोट’ने धडक दिल्यामुळे झालेल्या भीषण अपघातात 13 जणांचा मृत्यू झाला असून किमान 98 जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी चौघांची प्रकृती चिंताजनक आहे. पाच जण अद्याप बेपत्ता असून रात्री उशिरापर्यंत त्यांचा शोध लागू शकला नव्हता. मृतांमध्ये सात पुरुष, चार महिला व दोन बालकांचा समावेश आहे.

‘नीलकमल’ ही प्रवासी बोट पर्यटक आणि प्रवाशांना घेऊन घारापुरीकडे जात होती. दुपारी 3.55 वाजता नौदलाच्या एका ‘स्पीड बोटी’ने प्रवासी बोटीला उजव्या बाजूने जोरदार धडक दिली. त्यामुळे ‘नीलकमल’ बोट कलंडली आणि बुडू लागली. अपघाताची माहिती मिळताच नौदल, तटरक्षक दल व मुंबई सागरी पोलिसांच्या पथकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. नौदलाच्या 11 नौका, तटरक्षक दलाची एक व यलोगेट पोलीस ठाण्याच्या 3 नौका तसेच स्थानिक मच्छीमार नौकांच्या सहाय्याने मदतकार्य सुरू करण्यात आले. नौदलाच्या चार हेलिकॉप्टरचीही मदत घेण्यात आली.

घटना घडली त्यावेळी दोन्ही बोटींवर प्रवासी आणि कर्मचाऱ्यांसह बोटीवर एकूण 114 जण होते. यापैकी 13 जणांचा मृत्यू झाला असून चौघांची प्रकृती चिंताजनक आहे. 97 जणांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मुंबई महापालिकेकडून देण्यात आली. जखमींपैकी जेएनपीटी रुग्णालयात 75, नेव्हल डॉकयार्डमध्ये 25, अश्विनी रुग्णालयात एक, सेंट जॉर्जमध्ये नऊ, करंजे येथे 12, तर मोरा रुग्णालयात 10 जणांना दाखल करण्यात आले आहे. नीलकमल बोटीवरील पाच कर्मचारी सुखरूप असल्याची माहिती महापालिकेकडून देण्यात आली. बेपत्ता प्रवाशांचा शोध सुरू असून पोलिसांनी प्रत्यक्षदर्शींचे जबाब नोंदवले आहेत. अपघाताची चित्रफीतही समाजमाध्यमांवर प्रसारित झाली असून त्याची पडताळणी सुरु असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. या प्रकरणी यलोगेट पोलिसांनी अपमृत्यूची नोंद केली आहे. अपघातासाठी जबाबदार व्यक्तीवर गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया कुलाबा पोलीस ठाण्यात सुरु असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

### पंतप्रधान, मुख्यमंत्र्यांकडून मदत जाहीर

दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना पाच लाखांच्या आर्थिक मदतीची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुरात केली.तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही घटनेबद्दल दु:ख व्यक्त करत, दोन लाखांची मदत मृतांच्या वारसांना जाहीर केली. प्रसंगाचे गांभीर्य लक्षात घेता नौदल, तटरक्षक दल, मुंबई पोलिस यांनी तातडीने मदतकार्य हाती घेतल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. या घटनेची नौदल आणि राज्य सरकारमार्फत चौकशी केली जाईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

मुंबईजवळ समुद्रात नौदलाच्या बोटीने प्रवासी बोटीला धडक दिल्याने अनेकांना प्राण गमवावे लागणे दु:खद आहे. दोन्ही बोटींमधील जखमींवर उपचार केले जात आहेत. नौदल आणि तटरक्षक दलाने बेपत्ता प्रवाशांचे शोध व बचावकार्य हाती घेतले आहे.
**- राजनाथ सिंह, संरक्षणमंत्री**

# अजित पवारांची एवढी ताकद नाही; विजय शिवतारेंचा हल्लाबोल

## शिवसेना हे माझं कुटुंब : विजय शिवतारे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
पुरंदरचे शिवसेना आमदार विजय शिवतारे यांचा मंत्रिमंडळातून पत्ता कट करण्यात आला. त्यानंतर आम्ही नेत्यांचे गुलाम नाहीत, असं म्हणत नागपूर येथील विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सोडून आमदार शिवतारे यांनी थेट आपला मतदारसंघ गाठत मतदारसंघात विविध कार्यक्रमांना उपस्थिती दर्शवली. त्यानंतर आता विजय शिवतारेंनी पुन्हा एकदा आपली भूमिका मांडली असून राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर



जोरदार निशाणा साधला आहे.

पत्रकारांकडून तुमचा मंत्रिमंडळातून पत्ता कट करण्यात अजित पवारांचा हात आहे का, असा प्रश्न विजय शिवतारे यांना विचारण्यात आला होता. त्यावर बोलतना म्हणाले कि, अजित पवारांची एवढी ताकद नाही. एकनाथ शिंदे असे कोणाचे ऐकून निर्णय घेत नाहीत, असं विजय शिवतारे म्हणाले. तसेच अनेक जण वाईटावर असताना आम्ही 27 हजारांचे मताधिक्य मिळवले आहे, असा टोलाही विजय शिवतारे यांनी लगावला आहे.

पुढे बोलताना म्हणाले, दोन दिवस आधी मला मंत्रिपद मिळणार नसल्याची कल्पना दिली असती तर काहीच वाटलं नसतं. परंतु माझे सर्व कुटुंबीय आणि मतदारसंघातील कार्यकर्ते 300 हून अधिक गाड्या घेऊन नागपूरला आले होते. या सगळ्यांचा हिरमोड झाला. त्यामुळे प्रचंड अस्वस्थता होती.






# उड्डाणपुलाच्या कामासाठी सर्व्हिस रस्त्याचे 15 दिवसात भूसंपादन करणार



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
शहरातील कात्रज चौकातील उड्डाणपुलाच्या कामासाठी दोन्ही बाजूला सर्व्हिस रस्ता करण्यात येणार आहे. त्यासाठी भूसंपादनाची कार्यवाही तातडीने सुरु आहे. कात्रज-कोंढवा रस्त्याच्या कामासाठी राज्य सरकारकडून 140 कोटी आले आहेत. त्यातून हे भूसंपादन केले जाणार आहे. येत्या 15 दिवसात हे भूसंपादन मार्गी लागणार आहे, असे पुणे महापालिकेचे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी सांगितले.

कात्रज-कोंढवा रस्त्याचे भूसंपादन होत नसल्यामुळे हा प्रकल्प रखडला आहे. अगोदर 84 मीटरचा रस्ता करण्यात येणार होता. मात्र भूसंपादनासाठी लागणारा खर्च वाढत असल्यामुळे सुरुवातीला 50 मीटर रस्ता विकसित करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाकडून घेण्यात आला आहे. पण रस्त्याचे काम रखडल्यामुळे कात्रजकरांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.

शासनाकडून महापालिकेस 140 कोटींचे अनुदान मिळालेले असूनही ही प्रक्रिया रखडलेली आहे. त्यामुळे आयुक्तांनी स्वत: बैठक घेत प्रशासनास तातडीनं भूसंपादनाचे आदेश दिले होते. या जागामालकांसोबत तसेच या पुलाच्या कामात कोंढव्याच्या दिशेच्या रॅम्पच्या कामासाठी जागांच्या मालकांची बैठक महापालिका आयुक्तांनी घेतली होती.

त्यातून हे भूसंपादन केले जाणार आहे. येत्या 15 दिवसात या भागाचे हे भूसंपादन मार्गी लागणार आहे, अशी माहिती आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी दिली.

कात्रज-कोंढवा रस्त्याचे काही प्रमाणात टीडीआर देऊन भूसंपादन झाले आहे. त्यामुळे हा रस्ता तुकड्या तुकड्यामध्ये तयार आहे. रस्त्यासाठी आवश्यक असलेल्या जागेच्या भूसंपादनाअभावी रस्त्याचे काम रखडले आहे. त्यातच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सदर रस्त्याची रुंदी 84 मीटर करावी, अशी सूचना केली होती.

त्यानुसार महापालिकेने आता या रस्त्याचे 84 मीटरपर्यंत रुंदीकरण करण्यासाठी कार्यवाही सुरु केली आहे. त्यासाठी पालिकेला भूसंपादनासाठी 231 कोटी रुपये लागणार आहेत. त्याबाबतचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविला आहे. या निधीतून 1 लाख 75 हजार मीटरचे भूसंपादन केले जाणार आहे, असे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी सांगितले.




# काँग्रेस नेतृत्वाकडून ज्येष्ठांची उपेक्षा!



काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मणिशंकर अय्यर यांच्या वक्तव्यामुळे पुन्हा एकदा काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वावरून नव्याने चर्चा सुरू झाली आहे. देशाच्या स्वातंत्र्य लढ्याचा वारसा सांगणाऱ्या, सव्वाशे वर्षांपेक्षा अधिक काळ देशाच्या कानाकोपऱ्यांत पसरलेल्या काँग्रेस पक्षाची जी आज वाताहत झाली आहे, त्याला गांधी कुटुंबातील नव्या पिढीचे नेते राहुल गांधी कसे जबाबदार आहेत, अशी उघड टीका काँग्रेसच्या नेत्यांकडून यापूर्वी झाली होती. 2019 साली लोकसभेत विरोधी पक्षनेते पदावर दावा करण्याएवढे खासदार निवडून आणण्यात काँग्रेसला यश मिळाले नव्हते. त्यामुळे पक्ष नेतृत्व करणाऱ्या राहुल गांधी यांच्यामुळे पक्षाला पराभव पत्करावा लागला, याचे अनेक किस्से काँग्रेसच्या नेत्यांकडून खासगीत उघडपणे सांगण्यात आले होते. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मणिशंकर अय्यर यांनी नुकतीच एका वृत्तसंस्थेला मुलाखत दिली. या मुलाखतीत अय्यर यांनी गांधी कुटुंबासंबंधी काही दावे केले आहेत. मणिशंकर अय्यर यांनी मागील 10 वर्षांत त्यांना फक्त एक वेळ सोनिया गांधी यांना भेटण्याची संधी मिळाल्याचे म्हटले आहे. तसेच गांधी कुटुंबाने माझी राजकीय कारकीर्द घडवली आणि बिघडवली, तरीही मी भाजपामध्ये जाणार नाही, असेही अय्यर यांनी त्यात स्पष्ट केले आहे. राहुल गांधींबरोबर एक प्रसंग वगळता त्यांच्याशी विस्तृत चर्चा करण्याची संधी मिळालेली नाही, तर प्रियंका गांधी यांच्याबरोबर एकदाही भेट झाली नाही. मला पक्षाबाहेर राहण्याची सवय झाली आहे. मी अजूनही पक्षाचा सदस्य आहे. मी पक्ष कधीही बदलणार नाही, असे मणिशंकर यांनी मुलाखतीत सांगितले. मणिशंकर यांच्या या मुलाखतीमुळे, काँग्रेसचे नेतृत्व करणारे सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांच्या कार्यशैलीबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तसे पाहायला गेले तर, काँग्रेसमधील वाचाळवीर नेते अशीच मणिशंकर यांची ओळख आहे. यापूर्वी त्यांनी अनेक वादग्रस्त वक्तव्य करून,



कधी स्वत: तर कधी पक्षाला अडचणीत आणण्याचे काम केले होते. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्याविषयी अनेकदा अपमानजनक वक्तव्ये मणिशंकर यांनी केली होती. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनीच धर्माच्या आधारे देशाचे विभाजन केले. द्विराष्ट्राची संकल्पनाही त्यांनीच मांडली होती, असेही वादग्रस्त विधान मणिशंकर अय्यर यांनी पाकिस्तानात जाऊन केले होते. भारतात सुरू असलेल्या मोहम्मद अली जिना यांच्या वादानंतरही, पाकिस्तानात जाऊन लाहोरमधील एका कार्यक्रमात जिना यांचे कौतुक केले होते. तसेच अय्यर यांनी जिनांची तुलना महात्मा गांधींशी केली होती. मी अनेक पाकिस्तानी नागरिकांना ओळखतो, जे एम. के. गांधी यांना महात्मा गांधी म्हणतात. मग यामुळे सर्व पाकिस्तानी देशद्रोही ठरतील का? असे वत्कव्य करत मणिशंकर यांनी पक्षाचा रोष ओढून घेतला होता. त्यामुळे मणिशंकर अय्यर यांना काँग्रेस पक्षातून निलंबित करण्यात आले होते. 2014 नंतरच्या जवळपास प्रत्येक निवडणुकांच्या निकालानंतर काँग्रेसचा दारूण पराभव ही हेडलाईन ठरलेली असायची. त्यामुळे काँग्रेस नेतृत्वात बदल व्हावा. गांधी कुटुंबीयांच्या व्यतिरिक्त नेत्यांकडे पक्षाची सूत्रे सोपवावी, असा आग्रह काँग्रेसमधील 23 नेत्यांनी धरला होता. पक्ष नेतृत्वाने आत्मचिंतन करावे असा जी-23 नावाने परिषद घेऊन ठराव मांडला होता. माजी केंद्रीय मंत्री गुलाम नबी आझाद, माजी केंद्रीय मंत्री कपिल सिब्बल, माजी मंत्री मनीष तिवारी, माजी केंद्रीय मंत्री शशी थरूर, काँग्रेसच्या पहिल्या फळीतील नेते आनंद शर्मा, माजी केंद्रीय मंत्री रेणुका चौधरी, माजी खासदार मुकुल वासनिक, माजी केंद्रीय राज्यमंत्री मिलिंद देवरा, हरियाणाचे माजी मुख्यमंत्री भूपिंदर हुड्डा आदींचा या जी-23 परिषदेमध्ये समावेश होता. 'नया लडका' असा राहुल गांधींचा उल्लेख करून गुलाम नबी आझाद यांनी त्यांच्यावरही टीका केली होती, तर राहुल गांधी यांना पप्पू नावाची जी उपाधी मिळाली ती काँग्रेस नेत्यांच्या गॉपिंगमधून पुढे आली होती. मात्र, भाजपा नेते हेच राहुल गांधी यांना पप्पू म्हणून हिणवतात, असा आरोप उलटा काँग्रेसवाल्यांकडून करण्यात आला होता. पक्षाच्या नेतृत्वाचा कार्यकर्त्यांशी संपर्क तुटल्यामुळे काँग्रेसने आपला पाया गमावला आहे. फाईव्ह स्टार हॉटेलात बैठका घेऊन निवडणुका लढवता येत नाहीत, राहुल गांधींनी काँग्रेसमधील सर्व सल्लागार यंत्रणा उद्ध्वस्त केली आहे आणि यूपीएचे नुकसान करणारी "रिमोट कंट्रोल" संस्कृती पक्षात आणली गेली आहे, असे मुद्दे उपस्थित करत काँग्रेसमधील नाराज नेत्यांनी जी-23 परिषदेच्या माध्यमातून मंथन केले आणि पक्षाला पुन्हा उभारी देण्याचा प्रयत्न केला; परंतु आत्मचिंतन करण्यापेक्षा ज्यांनी पक्षाचे हित जपण्याचा प्रयत्न केला त्यांना पक्षाच्या बाहेरचा रस्ता दाखविण्याचे काम करण्यात आले. कपिल सिब्बलसारख्या कायदेतज्ज्ञ नेत्याला काँग्रेसने गमावले. गुलाम नबी आझाद यांनी काँग्रेसशी फारकत घेत, स्वतंत्र पक्ष काढण्याचा निर्णय घेतला होता. गेल्या 10 वर्षांत काँग्रेस पक्षाला कोणताही अजेंडा नसल्यामुळे कधी जातीजनगणनेचा मुद्दा राहुल गांधी लावून धरतात. कधी ते ओबीसींच्या हक्काची भाषा बोलतात. संविधान बचावचे खोटे नरेटीव्ह तयार करून, 2024 च्या लोकसभेत निवडणुकीत 44 वरून 99 पर्यंत खासदार निवडून आणण्यास काँग्रेसला यश मिळाले असले तरी, त्यानंतर झालेल्या हरियाणा, महाराष्ट्र येथील विधानसभा निवडणुकांमध्ये काँग्रेसचा सुफडा साफ झाला. याचा अर्थ संविधान बचाव हा मुद्दा आता बासनात गुंडाळला गेला आहे. त्यामुळे किमान आता तरी, ज्या नेत्यांनी पक्षांसाठी आयुष्य खर्च केले त्यांना विश्वासात घ्या, अशी मागणी केली तरीही ती प्रथा काँग्रेस पक्षात सुरू होईल का? हाही आज कळीचा मुद्दा आहे.

# लिला पुनावाला फाउंडेशनचे 29 वर्षे

## शिक्षणाच्या माध्यमातून मुलींचा सशक्तीकरण प्रवास साजरा

**पुणे (दै. आरंभ पर्व)** लिला पुनावाला फाउंडेशनने (एलपीएफ) आपल्या 29व्या वर्धापन दिनानिमित्त 6 शहरांतील 1,500 हून अधिक आर्थिकदृष्ट्या वंचित पण गुणवान मुलींना गुणवत्ता सह गरजू आधारित शिष्यवृत्त्या प्रदान केल्या. या शहरांमध्ये महाराष्ट्रातील पुणे, वर्धा, अमरावती, नागपूर तसेच तेलंगणातील हैदराबाद आणि कर्नाटकमधील बेंगळुरू यांचा समावेश आहे. 2024-25 या शैक्षणिक वर्षात, एलपीएफने अभियांत्रिकी, नर्सिंग आणि विज्ञान क्षेत्रातील पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या 1,200 हून अधिक मुलींना त्यांच्या संपूर्ण शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिल्या. याशिवाय, 'टूमॉरो टुगेदर'



या शालेय प्रकल्पाअंतर्गत पुणे विभागातील 7वी पासून पदवीपर्यंतच्या शिक्षणासाठी जवळपास 300 मुलींना शिष्यवृत्ती देण्यात आल्या.

या शिष्यवृत्ती प्रदान समारंभाचे आयोजन 13 वेगवेगळ्या कार्यक्रमांत करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये एलपीएफच्या अध्यक्षा श्रीमती लिला पुनावाला – अध्यक्ष , श्री. फिरोज पुनावाला – संस्थापक विश्वस्त, कॉर्पोरेट भागीदार, दाते आणि हितचिंतक यांच्या उपस्थितीत शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आल्या.

संस्थेच्या स्थापनेपासून आजवर एलपीएफने 17,300 हून अधिक मुलींना शिष्यवृत्ती प्रदान केल्या असून त्यामुळे सशक्त महिलांचे एक विस्तारित समुदाय निर्माण झाले आहे. पुणे, वर्धा, अमरावती, नागपूर, हैदराबाद आणि बेंगळुरू येथे उपस्थित असलेल्या या संस्थेने शिक्षण आणि सशक्तीकरणाचा प्रवास सुरू ठेवला आहे.

एलपीएफ पुढील वर्षी आपला 30वा वर्धापन दिन साजरा करणार असून या महत्त्वपूर्ण टप्प्यानिमित्त संस्थेने 20,000 मुलींना सशक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. शिक्षणाच्या माध्यमातून तरुण आयुष्ये बदलण्याच्या आपल्या ध्येयाशी एलपीएफ दृढपणे बांधिल आहे.



# सर्वपक्षीय निषेध आंदोलन

**उरूळी कांचन (दै. आरंभ पर्व)** परभणी येथे संविधान शिल्प विटंबना झाल्यानंतर राज्यभर निषेध आंदोलने असताना सोमनाथ सूर्यवंशी या एल. एल. बी.करणारा युवा भीमसैनिकाचा पोलीस कस्टडी मध्ये संशयास्पद मृत्यू झालेला आहे. या घटनेचा निषेध करण्यासाठी पुर्व हवेली सर्व पक्षीय आंबेडकरी संघटनेच्या वतीने लोणी काळभोर रेल्वे स्टेशन चौकामध्ये रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. या प्रसंगी शेकडो भीमसैनिक व संविधान समर्थक नागरीक उपस्थित होते. या प्रसंगी महाराष्ट्र सरकार व पोलीस प्रशासनाचा निषेध करण्यात आला. या प्रकरणातील आरोपी अटक जरी असले तरी देखील या प्रकरणा मास्टर माईंड शोधून त्यांच्यावर कठोर कारवाई ची मागणी या प्रसंगी करण्यात आली. शहिद सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्येस जबाबदार पोलीस अधिकाऱ्यांचे तात्काळ निलंबन करून त्यांच्यावरती सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशीही मागणी करण्यात आली आहे.

# पाटणा पायरेट्स संघाची बंगाल वॉरियर्सवर मात

**पुणे (दै. आरंभ पर्व)** पाटणा पायरेट्स संघाने बंगाल वॉरियर्सवर 41-37 अशी मात केली आणि प्रो कबड्डी स्पर्धेत प्ले ऑफ मध्ये प्रवेश केला.मध्यंतराला पाटणा संघाने 19-18 अशी आघाडी घेतली होती. श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी येथील बॅडमिंटन स्पर्धेत पाटणा संघाने यंदाच्या मोसमात झालेल्या वीस सामन्यांपैकी आठ सामने जिंकले होते तर तेलुगु टायटन्स संघाने आतापर्यंत 20 सामन्यांमध्ये अकरा विजय मिळवले होते.

प्ले ऑफमध्ये स्थान मिळवण्यासाठी हे दोन्ही संघ कसोशीने प्रयत्न करीत असल्यामुळेच आजचा सामना दोन्ही संघांसाठी अतिशय महत्त्वाचा होता. दोन्ही संघांनी सुरुवातीपासून आघाडी घेण्याच्या दृष्टीने जोरदार प्रयत्न केले मात्र पाटणा संघाच्या खेळाडूंनी केलेल्या चुकांमुळे तेलुगु संघाने त्यांच्यावर पहिला लोण चढविला. हा लोण स्वीकारल्यानंतरही पाटणा संघाची जिद्द कायम होती. त्यामुळेच त्यांनी पिछाडी भरून काढीत मध्यंतराला एक गुणाची नाममात्र आघाडी मिळवली होती. उत्तरार्धात सुरुवातीलाच त्यांनी लोण चढविला आणि सामन्यातील रंगत वाढवली. शेवटची दहा मिनिटे बाकी असताना त्यांच्याकडे तीन गुणांची आघाडी होती. त्यांचा भरवशाचा खेळाडू देवांक याने खोलवर चढाया करीत आपल्या संघास अधिकाधिक गुण मिळवून दिले.

# मेडिकव्हर्ड फॅमिली हेल्थ कार्डची सुरुवात

**पुणे (दै. आरंभ पर्व)** भारतातील आघाडीची आरोग्यसेवा पुरवठादार असलेल्या मेडिकव्हर हॉस्पिटल्सने आज "मेडिकव्हर्ड फॅमिली कार्ड" चे उद्घाटन आपल्या भोसरी शाखेत केले. या उपक्रमाचे उद्घाटन पिंपरी चिंचवड शहरातील जेष्ठ नागरिक व विविध सोसायट्यांच्या प्रमुखांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमात बोलताना, मेडिकव्हर हॉस्पिटल भोसरीचे केंद्र प्रमुख डॉ व्यास मौर्य यांनी सांगितले, "आरोग्यसेवा ही प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क आहे, आणि मेडिकव्हर्ड फॅमिली कार्डसारख्या उपक्रमांमुळे दर्जेदार आरोग्यसेवा सामान्य



नागरिकांच्या अधिक जवळ जाते. हे कार्ड अधिक निरोगी समाज निर्माण करण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे, जिथे कुटुंबांना परवडणाऱ्या खर्चात आरोग्यसेवा सहज उपलब्ध होईल." ते पुढे म्हणाले, "मेडिकव्हर हॉस्पिटल मध्ये आमचे प्राधान्य नेहमीच रुग्णांना योग्य सेवा व आधार देणे आहे. मेडिकव्हर्ड फॅमिली कार्ड हे आमच्या रुग्णांशी असलेल्या नात्याला अधिक दृढ करण्याचे माध्यम असून, प्रगत, अत्याधुनिक परवडणारी आणि स्नेहपूर्ण आरोग्यसेवा प्रत्येक कुटुंबाला उपलब्ध करून देण्याचा आमचा मानस आहे.

हे फॅमिली कार्ड केवळ सवलतींसाठी नाही तर तुमच्या कुटुंबाच्या आरोग्यसेवेसाठीचे वचन आहे. आम्ही दर्जेदार आरोग्यसेवा नेहमीच उपलब्ध असल्याचे सुनिश्चित करत आहोत मग तुम्ही भारतात कुठेही असाल.

भारतातील सर्व 23 मेडिकव्हर हॉस्पिटल्स मध्ये हे कार्ड उपलब्ध आहे हे कार्ड अनेक फायदे देते.

# छत्रपती संभाजी महाराज यांचे विचार प्रेरणादायी - शरद गोरे

**उरूळी कांचन(दै. आरंभ पर्व)** छत्रपती संभाजी महाराज यांचे अलौकिक विचार हे जगाला दिशादर्शक व प्रेरणादायी आहेत असे मत सुप्रसिध्द साहित्यिक शरद गोरे यांनी व्यक्त केले ते अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद आयोजित 16 व्या छत्रपती संभाजी महाराज मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून बोलताना व्यक्त केले. मौलाना अबुल कलाम सभागृह कोरेगाव पार्क, पुणे येथे हे संमेलन संपन्न झाले. बहूभाषा पंडित असणारे जागतिक कीर्तींचे विचारवंत साहित्यिक छत्रपती संभाजी महाराज जगापुढे येणं गरजेचे आहे. संभाजीराजेंचे



साहित्य हे मानवी मूल्यांवर भाष्य करणारं आहे. समता, समानता हि त्यांच्या विचारांच्या क्रेंद्रस्थानी असल्याने त्यात विश्व कल्याणाचा सार दडला आहे त्याचा जागतिक पातळीवर प्रचार झाला पाहिजे त्यासाठी राज्य सरकाराने पुढाकार घेतला पाहिजे. बुधभूषण, नायिकाभेद, सातशतक, निखशिख, या संभाजीराजेंनी लिहिलेले ग्रंथ सर्व भाषेत पोहचले पाहिजेत. सर्व विद्यापीठात त्यांच्या साहित्याचा तौलिक व मौलिक अभ्यास होण्यासाठी अध्यासनं निर्माण झाली पाहिजेत व मुंबई विद्यापीठाला छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव दिले पाहिजे. तसेच केंद्र सरकारच्या महापुरूषांच्या यादीत संभाजीराजेंचा समावेश करावा अशी मागणी उद्घाटन पर भाषणात गोरे यांनी केली. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाल सबनीस, स्वागताध्यक्ष किशोर टिळेकर, निमंत्रक सुर्यकांत नामुगडे, साहित्य परिषदेचे राष्ट्रीय खजिनदार फुलचंद नागटिळक, प्रदेश संघटक अमोल कुंभार,

पुणे शहराध्यक्ष ज्ञानेश्वर धायरीकर, जयश्री नांदे, सिंधुताई साळेकर, बाळकृष्ण अमृतकर, विनोद अष्टुळ, नाना माळी, रमेश रेडेकर, प्रतिभा मगर, निखील घाडगे आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी वसंतराव पाटील यांना जीवनगौरव अनिल सांगळे (समाजरत्न), चंद्रशेखर भांगे (पत्रकाररत्न), हनुमंत चिकणे (कृषीरत्न), राजन जांबळे (पर्यावरणरत्न), लविना चांदेकर (शिक्षकरत्न) यांनी छत्रपती संभाजी महाराज राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या साहित्य संमेलनात राज्यभरातील 132 साहित्यिकांनी आपला सहभाग नोंदवला होता.

# थोडक्यात

## सतीश गुप्ता यांना दि पूना मर्चेंट्स चेंबरचा आदर्श व्यापारी पुरस्कार



**पुणे (आरंभ पर्व) :** दि पूना मर्चेंट्स चेंबरतर्फे व्यापार महर्षी स्व. उत्तमचंदजी उर्फ बाबा पोकर्णा यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी दिल्या जाणारा आदर्श व्यापारी पुरस्कार 2024-25 जाहीर करण्यात आले आहेत. चेंबरच्या सभासदांमधून दिला जाणारा पुरस्कार मे. पुरणचंद ॲन्ड सन्स्चे संचालक सतीश पुरणचंद गुप्ता यांना घोषित करण्यात आला आहे. राज्यसभा खासदार व सुप्रसिद्ध हिरे व्यावसायिक गोविंद ढोलकिया यांच्या हस्ते सतीश गुप्ता यांना हा पुरस्कार दिला जाणार आहे. या पुरस्काराची घोषणा चेंबरचे अध्यक्ष रायकुमार नहार यांनी केली. या वेळी उपाध्यक्ष अजित बोरा, सचिव ईश्वर नहार, सहसचिव आशिष दुगड, माजी अध्यक्ष राजेंद्र बाठिया, प्रवीण चोरबेले उपस्थित होते. सतीश गुप्ता हे पुण्यातील प्रमुख हॉटेल व्यवसायिक व नामांकित शैक्षणिक संस्थांना खाद्य सामग्री पुरवठा करणारे प्रतिष्ठित व्यापारी आहेत. त्यांनी 17व्या वर्षी किराणा मालाच्या व्यवसायात पाऊल ठेवले आणि आज एक नावाजलेले व्यवसायिक म्हणून ते ओळखले जातात. वक्तशीरपणा, सचोटी आणि समाजसेवेसाठी सतीश गुप्ता हे प्रसिद्ध आहेत. आज त्यांच्याकडे विविध व्यवसायाच्या माध्यमातून 2500 पेक्षा जास्त कामगारांना रोजगार उपलब्ध झालेला आहे. पुरस्कार वितरण समारंभ 20 डिसेंबर 2024 रोजी सायंकाळी 5 वाजता जयराज स्पोर्ट्स अँड कन्वेन्शन सेंटर, क्रोम बॅक्वेट, कोंढवा, पुणे येथे होणार आहे.

## शाळकरी विद्यार्थिनीचा हृदयविकाराने मृत्यू




**राजगुरूनगर (आरंभ पर्व) :** राजगुरूनगर येथील महात्मा गांधी विद्यालयात इयत्ता नववीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीचा हृदयविकाराने शाळेत मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (दि. 18) घडली. स्नेहा एकनाथ होले (वय 15, रा. होलेवाडी, ता. खेड) असे मृत्यू झालेल्या विद्यार्थिनीचे नाव आहे. स्नेहा होले ही विद्यार्थिनी राजगुरूनगर येथील महात्मा गांधी विद्यालयात इयत्ता नववीत शिकत होती. सकाळी ती नेहमीप्रमाणे शाळेत आली होती. शाळेत स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित केलेल्या व्याख्यानाच्या कार्यक्रमात बसली होती. सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास तिला अस्वस्थ वाटून चक्कर आली. शिक्षकांनी तात्काळ तिला खासगी रुग्णालयात दाखल केले. उपचारापूर्वीच तीचा मृत्यू झाला. स्नेहाच्या कुटूंबात एक भाऊ, आई, वडील असा परिवार आहे. या घटनेने शाळेवर शोककळा पसरली. तसेच होलेवाडी व परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## पीओजीएस तर्फे दोन दिवसीय वार्षिक परिषदेचे आयोजन

**पुणे (आरंभ पर्व) :** पुणे ऑब्स्टेट्रिक ॲन्ड गायनेकोलॉजिकल सोसायटी (पीओजीएस) तर्फे हॉटेल शेरटन ग्रँड येथे 21 व 22 डिसेंबर 2024 रोजी 33 वी वार्षिक परिषद आणि असोसिएशन ऑफ महाराष्ट्र ऑब्स्टेट्रिक्स ॲन्ड गायनेकोलॉजिकल सोसायटीजच्या विविध समितींच्या सहकार्याने पर्ल्स ॲन्ड पिटफॉल्स इन एंडोस्कोपी ॲन्ड एआरटी, एंडोएआरटी या 6 व्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या दोन दिवसीय परिषदेत प्रमुख बीजभाषण,साद रीकरणे,कार्यशाळा,शोधनिबंध,पोस्टर स्पर्धा,चर्चासत्रे आणि राष्ट्रीय स्तरावरील तज्ञांद्वारे चर्चा यांचा समावेश आहे. या परिषदेला 4 एमएमसी आणि 11 आयसीओजी गुणांसाठी प्रमाणन मिळाले आहे. या परिषदेच्या उद्घाटन समारंभाला प्रसिध्द नाट्य व चित्रपट दिग्दर्शक डॉ.जब्बार पटेल हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून फॉग्सीच्या प्रेसिडेंट इलेक्ट डॉ.सुनिता तांदुळवाडकर व असोसिएशन ऑफ महाराष्ट्र ऑब्स्टेट्रिक्स ॲन्ड गायनेकोलॉजिकल सोसायटीजचे अध्यक्ष डॉ.किरण कुर्तकोटी हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

## थोडक्यात



### पीआयसीटी महाविद्यालयात iDosT प्रकल्पासाठी सामंजस्य करार

पुणे: (आरंभ पर्व) : पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी (PICT) च्या E&TCE विभागाने क्रिस्टल इंडिया LLP, पुणे यांच्यासोबत सामंजस्य करार केला आहे. या करारांतर्गत iDosT नावाचा वैद्यकीय इलेक्ट्रॉनिक्स प्रकल्प विकसित केला जात आहे. हा प्रकल्प डॉ. शिव वर्मा यांच्या अमेरिकन पेटंटवर आधारित असून वैद्यकीय क्षेत्रात मोठा बदल घडविण्याची क्षमता आहे. नुकतीच, प्रकल्पाचे प्रणेते डॉ. शिव वर्मा,करूणाकर नामपल्ली यांनी PICT महाविद्यालयाला भेट देत iDosT प्रकल्पाची प्रगती पाहिली. डॉ. वर्मा हे युनिव्हर्सिटी ऑफ इलिनॉय अर्बाना-शॅम्पेन येथून इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकीतील PhD पदवीधारक असून, दूरसंचार व तंत्रज्ञान क्षेत्रात त्यांचा मोठा अनुभव आहे. त्यांच्या नावावर 12 पेक्षा जास्त अमेरिकन पेटंट्स असून ते भारत आणि अमेरिकेतील स्टार्टअप कंपन्यांशी संबंधित आहेत. या प्रकल्पासाठी डॉ. संदीप गायकवाड, प्रा. ललित पाटील, आणि प्रा. सुनील खोत यांचा सक्रिय सहभाग असून, प्रा. एम. व्ही. मुनोत यांचे मार्गदर्शन लाभले आहे. प्रकल्पाच्या प्रगतीसाठी विद्यार्थ्यांनी मोठी मेहनत घेतली असून Robotics Club च्या विद्यार्थ्यांनीही आपले योगदान दिले आहे. पीआयसीटीचे प्राचार्य डॉ. एस. टी. गंधे आणि संचालक डॉ. पी. टी. कुलकर्णी यांनी या प्रकल्पाला संपूर्ण पाठबळ दिले आहे. iDosT प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण संशोधन आणि कौशल्य विकसित करण्याची संधी मिळणार आहे.



### जाधवर इन्स्टिट्यूटस तर्फे आदिवासी बांधवांना वस्त्रदान

- विद्यार्थ्यांनी गोळा केलेल्या १० हजार कपड्यांची मदत
- सत्या फाउंडेशनच्या सहकार्याने उपक्रम

पुणे : (आरंभ पर्व) : आदिवासी व ग्रामीण भागातील कुटुंबांचा कडाक्याच्या थंडीपासून बचाव व्हावा, या उद्देशाने नऱ्हे येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या विद्यार्थ्यांनी जमा केलेल्या 10 हजार कपडयांची मदत आदिवासी बांधवांना पाठविण्यात आली. सत्या फाउंडेशन, पुणे च्या सहकार्याने उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जाधवर इन्स्टिटयूटच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमाला सत्या फाऊंडेशनच्या गीतांजली जाधव, जाधवर इन्स्टिटयूटचे उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर आदी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते कपडयांनी भरलेल्या टेम्पोला हिरवा झेंडा दाखविण्यात आला. गीतांजली जाधव म्हणाल्या, कोणतेही पाठबळ, आर्थिक मदत नसताना झोमॅटो सारख्या कंपनीमुळे पुणे आणि लगतच्या परिसरात जवळपास 70 ते 75 लाख रुपयांचे धान्य वाटप आम्ही करु शकलो. भोर, वेल्हे पानशेत, आंबी यासह अनेक ठिकाणच्या आदिवासी पाड्यांमध्ये धान्य वाटपासोबतच कपडे व इतर वस्तूंचे वाटपही फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे. माझ्यासारख्या एका सामान्य व मध्यमवर्गीय कुटुंबातील महिलेला समाजातील सर्व घटकांमधून मान्यता आणि प्रोत्साहन मिळाल्याने आणखी समाजोपयोगी कार्य करण्यास प्रेरणा मिळेल, असेही त्यांनी सांगितले. ॲड. शार्दुल जाधवर म्हणाले, समाजातील गरजू घटकांना विविध योजनांच्या माध्यमातून मदत देण्याकरिता शासनाच्या सर्व यंत्रणा कार्यान्वित असतात. मात्र, सामाजिक संस्थांसह सामान्य नागरिक म्हणून आपलीही जबाबदारी आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणिव निर्माण करण्याचा प्रयत्न यानिमित्ताने करण्यात आला. विद्यार्थ्यांनी चांगले कपडे गोळा करून गरजूंपर्यंत पोहोचविण्याच्या उपक्रमात मोठा वाटा उचलला आहे.

# 15 जोडप्यांच्या भव्य सामूहिक विवाह सोहळ्याचा उत्सव




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुन्यधाम आश्रमाचा वार्षिक 'सामूहिक विवाह सोहळा' 15 डिसेंबर 2024 रोजी आयोजित करण्यात आला. महाराष्ट्रातील विविध भागांतून आलेल्या 15 जोडप्यांनी या विशेष सोहळ्यात विवाह बंधनात अडकून उपस्थित सर्वांच्या हृदयाला आनंद दिला. हा विवाह सोहळा पुन्यधाम आश्रमाने समाजातील गरजू घटकांसाठी आयोजित केला होता, तोही कोणताही खर्च किंवा हुंड्याविना. हा सोहळा पुन्यधाम आश्रमाने सलग 9व्या वर्षी आयोजित केला होता आणि आजपर्यंत 150 हून अधिक जोडप्यांचे अशा भव्य उत्सवात विवाह लावण्यात आले आहेत. विधीस्थळी उपस्थित 2500 हून अधिक लोकांच्या उत्साह, आनंद आणि उत्सुकतेने संपूर्ण परिसर साजरा झाला होता. लग्नाच्या तयारीचा गडबडगोंधळ, शहनाईच्या सुरांनी भरलेले वातावरण, फुलांच्या सजावटी आणि सणासुदीचे सौंदर्य सर्वत्र पाहायला मिळाले. वधूनी सोनेरी-लाल साड्यांमध्ये चमक दाखवली, सुंदर दागिन्यांनी सजवलेल्या आणि वरांनी शेरवानी, फेटे व मोजरी परिधान करून अतिशय देखणे दिसत होते. वरांच्या वाजतगाजत आलेल्या वरातीने नाचत प्रवेश केला, तर वधूंचे कुटुंब त्यांचे स्वागत करण्यासाठी आतुरतेने वाट पाहत होते. शेवटी, वरांचे त्यांच्या वधूंशी सुशोभित मांडवात येऊन मिलन झाले आणि ज्ञानी पंडितांनी विवाह विधी सुरु केले. विवाह विधी पारंपरिक महाराष्ट्रीय अंतरपाटाने सुरू झाले आणि त्यानंतर फेरे व कन्यादान विधी झाले, जिथे प्रतिष्ठित पाहुणे उपस्थित होते.

"दरवर्षी पुन्यधाम आश्रम अशा मुलींसाठी सामूहिक विवाह आयोजित करतो, ज्या कुटुंबांना मोठ्या खर्चाचा भव्य विवाह लावणे शक्य होत नाही. मुलींना त्यांच्या कुटुंब व मित्रांसोबत सुंदर विवाहसोहळ्याचा आनंद मिळवून देण्यासाठी मदत केली जाते. हा अनोखा उपक्रम हुंड्याच्या प्रथेला हतोत्साहित करून समाजाच्या मानसिकतेत बदल घडवण्याचा प्रयत्न करतो," असे मां कृष्णा काश्यप, अध्यक्षा म्हणाल्या, ज्यांनी 'मानवतेच्या सेवेतून देवाची सेवा' हे आपले जीवनध्येय बनवले आहे!

या दिवशी अनेक मान्यवर व्यक्तींच्या उपस्थितीमुळे तो आणखीन खास बनला, ज्यांनी नवविवाहित जोडप्यांना शुभाशीर्वाद दिले.संपूर्ण पारंपरिक विधींनंतर, अध्यक्षा मां कृष्णा काश्यप, अध्यक्ष सदानंद शेट्टी, विश्वस्त आणि खास पाहुण्यांनी नवविवाहित जोडप्यांना त्यांच्या संसारासाठी आवश्यक वस्तूंच्या भेटवस्तू दिल्या. यामध्ये घरगुती वस्तू, डिनर सेट्स, कुकर, ब्लँकेट्स, नवीन साड्या आणि सलवार-कमीज सेट्सचा समावेश होता. "आमच्या शुभेच्छा नवविवाहित जोडप्यांसोबत आहेत. आम्ही त्यांना त्यांच्या वैवाहिक जीवनात खरा आनंद आणि एकत्रितपणा मिळो ही आशा करतो," असे मां काश्यप म्हणाल्या.

त्या जोडप्यांना पाहणे खूप आनंददायक होते, ज्यांनी काही वर्षांपूर्वी याच सोहळ्यात लग्न केले होते आणि हा विशेष प्रसंग साजरा करण्यासाठी पुन्हा एकत्र आले होते. त्यानंतर पाहुण्यांना भव्य महाराष्ट्रीय जेवण दिले गेले, ज्याचा सर्वांनी मनसोक्त आनंद घेतला.

या महान उपक्रमाचे संपूर्ण श्रेय मां कृष्णा काश्यप यांना जाते, ज्यांनी हा भव्य कार्यक्रम अत्यंत कौशल्याने आयोजित केला आणि परिपूर्णतेने अंमलात आणला. त्यांच्या समर्पित समर्थनाशिवाय, दयाळू उपस्थिती आणि प्रेरणे शिवाय, पुन्यधाम आश्रमातील कोणतेही कार्य शक्य झाले नसते.

## नेटवर्क18 ने आयोजित केले 'हरित भारत'

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

भारतामधील अग्रेसर मिडिया समूह नेटवर्क18 ने तिच्या भारतामधील सर्वात मोठी वास्तव कार्य करणारी इलेक्ट्रिक व्हेइकल (EV) कंपनी ओला इलेक्ट्रिकच्या सहकार्याने चालवलेल्या हरित भारत या वार्षिक संमेलनाचे समापन केले. EV च्या आर्थिक, पर्यावरणीय, आणि सामाजिक लाभांवर भर देऊन तसेच त्याचा अंमल करतांना येणाऱ्या आव्हानांना कसे तोंड द्यावे हे सांगत त्याची शाश्वत गतिशीलतेकडे भारताचे पदक्रमण या विषयावर भर देणे हा या उपक्रमाचा उद्देश्य आहे.

या ऐतिहासिक कार्यक्रमाने भारतामधील इलेक्ट्रिक गतिशीलतेच्या भविष्यासाठी एक एकत्रित योजना तयार करण्यासाठी पॉलिसीमेकर्स, निर्माते, उद्योग क्षेत्रातील प्रवर्तक, आणि अनुभवी अधिवक्ते यांना एकत्र आणले. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून स्थान भूषवले ते विविध अतिथींनी ज्यामध्ये रस्ते परिवहन आणि राज्यमार्ग मंत्री मा. श्री. नितीन गडकरी आणि वाणिज्य व उद्योगमंत्री श्री. पियुष गोयल यांचा समावेश होता.गेल्या काही वर्षांमध्ये, आम्ही हरित मोबिलिटी सेगमेंटमध्ये अतुलनीय प्रगती साधली आहे.

## सारोळ्याचे पोलीस पाटील अण्णासाहेब साबळे यांचा सन्मान

- गावाच्या तसेच सर्व निवडणुकांच्या शांतता सुव्यवस्थेसाठी केलेल्या प्रयत्नास पोलिसांकडून शाब्बासकी!



**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

बार्शी तालुक्यातील संवेदनशिल समजल्या जाणाऱ्या सारोळे गाव गेल्या अनेक वर्षापासून शांतता आणि सुव्यवस्था अबाधित राहिली आहे.

या गावच्या सर्व निवडणुका शांततामय मार्गाने सुव्यवस्थेत पार पडल्या.

या बद्दल सारोळे गावचे पोलीस पाटील अण्णासाहेब साबळे यांना पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी प्रशस्तीपत्रक देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान केला आहे.

वैराग पोलीस ठाणे येथे तालुक्यातील पोलीस पाटील यांना विविध सन्मान देण्यात आले.

त्यावेळी साबळे यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, वैराग चे पोलीस निरीक्षक निवृत्ती मोरे व सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदाळे यांच्या हस्ते त्यांना प्रशस्तीपत्र देण्यात आले. अण्णासाहेब साबळे यांनी 2018 पासून गावाची पोलीस पाटील पदाची धुरा घेतली. तेव्हा पासून विविध घटना आणि प्रकरणांनी बनलेले संवेदनशिल गाव शांत व्हायला सुरुवात झाली.

2019, 2020 मध्ये कोरोनाच्या लढाईतही त्यांनी चांगले कार्य केले.

पुढे 2022 साली एक गाव एक गणपती ही उपक्रम राबवला गेला.

ह्या सर्व उपक्रमात पोलीस पाटील अण्णासाहेब साबळे यांचाही अनमोल वाटा नक्कीच आहे. त्यामुळे त्यांना सन्मानित करण्यात आले..

यापुढेही चांगल्या प्रकारे सारोळे गाव व परिसरात शांतता सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रयत्न नक्की करेल. सर्वांचे सहकार्य सोबत असावे .अशी भावना पोलीस पाटील अण्णासाहेब साबळे यांनी यानिमीत बोलताना आरंभपर्व कडे व्यक्त केली.

## "राष्ट्रीय उत्कृष्ट कामगार नेतृत्व" पुरस्काराने राहुल कडू सन्मानित



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नवी दिल्ली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्लोबल इन्स्टिट्यूट या केंद्र शासनाच्या संस्थेकडून येरवडा कारागृह मुद्रणालयाचे कामगार नेते तसेच महाराष्ट्र गव्ह. प्रेसेस फेडरेशनचे अध्यक्ष राहुल कडू यांना राष्ट्रीय उत्कृष्ट कामगार नेतृत्व पुरस्कार 2024 केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते न्यू महाराष्ट्र सदन, दिल्ली येथे प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्रातील सर्व मुद्रणालयीन कामगारांचे प्रश्न राहुल कडू यांच्या कार्यकाळात मार्गी लागले असून अनेक कामे प्रगतीपथावर आहेत. संपूर्ण महाराष्ट्रातील मुद्रणालयीन कामगारांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांचे अथक व प्रामाणिक प्रयत्न सुरू असून राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र राज्य, पुणे जिल्हा यांच्याकडून जुनी पेन्शन योद्धा कर्मचारी पुरस्कार 2024 राहुल कडू यांना महाराष्ट्राचे सरचिटणीस विश्वास काटकर यांच्या हस्ते ही त्यांना मिळालेला आहे.

त्यांनी कामगारांसाठी मोठे योगदान दिल्याने त्यांच्या यशस्वी कार्याची दखल दिल्लीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर गॉगल इन्स्टिट्यूटने घेऊन त्यांना राष्ट्रीय उत्कृष्ट कामगार नेतृत्व पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला.

कामगार नेते राहुल कडू यांना हा पुरस्कार केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले, केंद्रीय मंत्री विजय राज, मराठी अभिनेत्री दिपाली सय्यद, खासदार नितीन पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला पुरस्कार मिळाल्यानंतर राष्ट्रवादीचे नेते शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, भाजप नेते विनोद तावडे, खासदार निलेश लंके, खासदार राजाभाऊ वाजे, खासदार अमोल कोल्हे आदींनी राहुल कडू यांचे अभिनंदन केले. यावेळी संसद भवन राष्ट्रपती भवन यांना भेट देण्याचा बहुमान राहुल कडू यांना मिळाला पुरस्कार मिळाल्यानंतर महाराष्ट्रातील कामगार संघटनांनी तसेच मुद्रणालयीन कामगार संघटनांनी त्यांचे अभिनंदन केले.



## अखिल औदुंबर नगर प्रतिष्ठाणतर्फे दत्त जयंती उत्सव साजरा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा..च्या जयघोषात वैष्णव भक्तांनी दरवर्षी साजऱ्या होणाऱ्या मार्गशीर्ष मराठी महिन्यातील पौर्णिमेला दत्त जयंतीचा उत्सव शनिवारी सायंकाळी मोठ्या उत्साहात साजरा केला. दत्त जन्म सोहळ्यासाठी या जयंती उत्सवाचे अवचित्य साधून दत्त भक्तामध्ये विशेष उत्साह दिसून येत होता. हडपसर मधील काळेपडळ मधील अखिल औदुंबर नगर प्रतिष्ठाण वतीन गेली 24 वर्ष दत्त जयंती उत्सव साजरा केला जात आहे.

या वर्षी देखील दत्त मंदिरात दत्तजन्म सोहळ्यासाठी विशेष फुलांची सजावट केली होती अखिल औदुंबर नगर प्रतिष्ठाण च्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते 3000 भाविकांनी महाप्रसादाचे लाभ घेतला उत्तम असे नियोजन करण्यात आले होते.

### उद्योगविश्वातील बदलांनुसार मनुष्यबळ व्यवस्थापनात बदल करण्यासाठी

# व्यावसायिकांनी सज्ज राहावे - प्रेम सिंग यांचे प्रतिपादन




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जागतिक आणि देश पातळीवर उद्योग विश्वात झपाट्याने बदल घडत असताना या बदलांशी अनुरूप बदल मनुष्यबळ व्यवस्थापनात घडवून आणण्यासाठी मनुष्यबळ विकास व्यवस्थापकांनी सज्ज राहिले पाहिजे असे प्रतिपादन नॅशनल एचआरडी नेटवर्क संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री प्रेम सिंग म्हणाले या मनुष्यबळ व्यवस्थापन व्यावसायिकांच्या संस्थेच्या आठव्या राष्ट्रीय अधिवेशनात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते

अनुभूती या सूत्रावर आधारित या अधिवेशनात 200 हून अधिक मनुष्यबळ व्यवस्थापन व्यावसायिक सहभागी झाले. संस्थेच्या पुणे शाखेला या राष्ट्रीय अधिवेशनाचे यजमानपद सलग चौथ्या वेळी मिळाले. व्यवस्थापनशास्त्र या विषयातील अध्यापक तसेच अध्ययन आणि विकास या व्यवसायातील सल्लागार हेही या अधिवेशनात सहभागी झाले होते. संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री प्रेम सिंग, पश्चिम विभाग अध्यक्ष उषा सिंग तसेच पुणे शाखा अध्यक्ष अमन राजाबली यांनी या अधिवेशनाच्या निमित्ताने पत्रकारांशी संवाद साधला.

संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री प्रेम सिंग म्हणाले, सेवा आणि औद्योगिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना कालानुरूप प्रशिक्षण मिळावे यासाठी नॅशनल एचआरडी नेटवर्क व्यवस्थापनशास्त्र या विषयातील अध्यापक आणि संशोधकांचेही सहकारी घेते. मात्र कर्मचाऱ्यांना यासाठी कोणती कौशल्ये आत्मसात करावी लागतील याचा शोध घेणे ही जबाबदारी मनुष्यबळ व्यवस्थापन व्यावसायिकांचीही आहे. यासाठी मनुष्यबळ व्यवस्थापन व्यावसायिकांना ते काम करत असलेल्या उद्योगांविषयी अधिकाधिक माहिती घेणे जरूरीचे आहे आणि या दिशेने प्रयत्न होत आहेत.

अनुभूति या चर्चासत्र मालिकेत सद्यस्थितीशी सुसंगत असे अनुभव मनुष्यबळ व्यवस्थापन व्यावसायिकांना घेता यावे असा प्रयत्न असतो, असेही श्री सिंग म्हणाले. "कृत्रिम बुद्धिमत्ता, यंत्रांची अध्ययन क्षमता (मशीन लर्निंग) यामुळे रोजगार कमी होतील ही भीती बाळगण्याचे कारण नाही. या दोन प्रवाहांमुळे रोजगारांचे स्वरूप जरूर बदलेल परंतु त्यातून नव्या संधीही तयार होतील," असे त्यांनी सांगितले.

एनएचआरडीएनच्या प्रादेशिक अध्यक्ष (पश्चिम) श्रीमती उषा सिंग यांनी संगितले की मनुष्यबळ व्यवस्थापनापुढील आव्हाने झपाट्याने बदलत आणि विस्तारत आहेत. विशेषतः कोव्हिड लाटेच्या नंतर घरी राहून काम करण्याकडे कर्मचाऱ्यांचा आणि उद्योगांचाही कल वाढत आहे. अशा बदलांचा कार्यक्षमता आणि उत्पादकता या पातळ्यांवर काय परिणाम होईल याचा अभ्यास होत आहे. उद्योग तसेच सेवा क्षेत्रात कार्यपद्धती झपाट्याने बदलत आहेत आणि या बदलांशी सुसंगत अशी कौशल्ये कर्मचारी वर्गाला आत्मसात करता यावीत यासाठी त्यांना योग्य शिक्षण - प्रशिक्षण देण्याची जबाबदारी मनुष्यबळ व्यवस्थापन व्यावसायिकांवर आली आहे.

नॅशनल एचआरडीएन पुणे चॅप्टर चे अध्यक्ष अमन राजाबली म्हणाले की मनुष्यबळातील वैविध्य हे एक मोठे आव्हान मनुष्यबळ व्यवस्थापन व्यावसायिकांपुढे आहे.

यामध्ये फक्त महिला - पुरुष असे वैविध्य नसून भारताच्या विविध भागातील मनुष्यबळ मुख्य प्रवाहात समाविष्ट करणे ही बाजूही पुढे आली आहे. तरुण कर्मचाऱ्यांच्या आकांक्षा समजून घेऊन मनुष्यबळ व्यवस्थापन धोरणे आणि नियमावली आखण्याची आवश्यकता आहे.

## थोडक्यात




### ‘चलो श्रीलंका’ उपक्रमाच्या शुभारंभाची घोषणा केली!

**पुणे (आरंभ पर्व) :** 18 डिसेंबर 2024 रोजी कंट्री क्लब हॉस्पिटॅलिटी अँड हॉलिडेज लिमिटेडने त्यांच्या बहुप्रतीक्षित न्यू इयर्स बॅश ‘वॉर ऑफ डीजे’ ची घोषणा केली. याआधी, सीसीएचएचएलने शाहरूख खान, सलमान खान यांसारख्या प्रसिद्ध सेलिब्रिटी तसेच कपिल देव, पी. व्ही. सिंधू यांसारख्या खेळाडूंच्या उपस्थितीत मनोरंजनाचे भव्य कार्यक्रम आयोजित केले होते. यावर्षी, सीसीएचएचएल संपूर्ण भारतातील त्यांच्या क्लब आणि रिसॉर्ट्समध्ये “एशियाचा सर्वात मोठा न्यू इयर्स बॅश 2025” आयोजित करणार असून मुख्य कार्यक्रम ‘वॉर ऑफ डीजे’ पुण्यातील कंट्री क्लब उंड्री येथे होणार आहे. या कार्यक्रमात सेलिब्रिटी डान्स परफॉर्मन्स, लाईव्ह म्युझिक आणि डीजे सादरीकरण असेल.अलीकडील काळात आंतरराष्ट्रीय पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी कंट्री क्लब इंडियाने ‘चलो श्रीलंका’ या नवीन उपक्रमाची घोषणा केली आहे. भारतीय पर्यटकांना श्रीलंकेतील अद्‌भुत सौंदर्य, सांस्कृतिक वारसा आणि जैवविविधतेचा आनंद घेण्यासाठी प्रोत्साहित करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. या उपक्रमात ‘बडे दिलवाले कार्ड’ ची सुरुवात करण्यात आली असून कंट्री क्लब सदस्यांना श्रीलंकेच्या पर्यटन अनुभवासाठी खास लाभ मिळणार आहेत. श्रीलंका ही नेहमीच भारतीय पर्यटकांची आवडती पर्यटन स्थळ राहिली आहे, ज्याला भारत आणि श्रीलंकेतील वाढत्या दळणवळण सुविधांनी अधिक बळ दिले आहे. प्रमुख भारतीय शहरांमधून नियमित विमानसेवा आणि नुकत्याच सुरू झालेल्या फेरी सेवेमुळे श्रीलंकेला प्रवास करणे अधिक सोपे आणि किफायतशीर झाले आहे. डिसेंबर ते एप्रिल या कालावधीत निळेशार आकाश आणि हिरव्यागार निसर्ग सौंदर्यामुळे पर्यटनासाठी हा सर्वोत्तम ऋतू मानला जातो. कोलंबोची आकर्षक नाईटलाईफ, कँडीचे ‘टेंपल ऑफ द टूथ रिली’ आणि किटुलगला येथील साहसी सफर, यासारख्या अनुभवांसह बडे दिलवाले कार्ड सदस्यांना एक अविस्मरणीय प्रवास प्रदान करेल.

### सामाजिक कार्याला सर्वतोपरी मदत करणार

**नाशिक (आरंभ पर्व) :** त्रंबकेश्वर येथे आत्महत्याग्रस्त झालेल्या कुटुंबियांचे मुले शिक्षण घेत आहे. या मुलांसह नाशिकच्या सामाजिक क्षेत्राला सर्वतोपरी मदत करणार असल्याची ग्वाही अग्रगण्य अशा ट्रॅव्हल वॉवीडेज कंपनीचे सीइओ राघव चौधरी यांनी दिली. हॉलिडे, टूर्स आणि एम.आय.सी.ई (मीटिंग्ज, इन्सेंटिव्ह कॉन्फरन्स आणि इव्हेंट्स) मधील अग्रगण्य कंपनी वॉवीडेज ने आपल्या नवीन शाखेचे नाशिकमध्ये उद्घाटन झाले. यावेळी राघव चौधरी सी,ई.ओ वॉवीडेज, नाशिक शाखा प्रमुख वैभव कुलकर्णी, योगेश मिस्त्री, सुधीर कौशिक उपस्थित होते. राघव चौधरी म्हणाले, ग्लोबल वॉवीडेज, ही एक विश्वासार्ह व दिग्गज कंपनी आहे. जी आपल्या ग्राहकांसाठी विविध प्रकारच्या पॅकेजची मेजवानी सादर करत असते. आम्ही नाशिकमध्ये शाखा उघडली आहे याचा आम्हाला आनंद होत आहे. कंपनीचा ग्राहकांप्रतीचा दृष्टिकोन अतिशय क्रांतिकारी आहे. त्यांनी ग्राहकांची हॉलिडेज कडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. या ऐतिहासिक प्रसंगी वॉवीडेज नववर्षासाठी खास ऑफर्स सादर करत आहे, जे ग्राहकांना प्रवास आणि इव्हेंट्ससाठी सर्वोत्तम मूल्य प्रदान करतील.भारतामध्ये आपली उपस्थिती वाढवण्यासाठी वॉवीडेज चा हा विस्तार आपल्या ग्राहक-केंद्रित उपायांमधील वचनबद्धतेचा पुरावा आहे. नाशिक शाखा कंपनीच्या मिशननुसार उत्कृष्ट प्रवास अनुभव देत, उद्योगात एक विश्वासार्ह नाव म्हणून आपली ओळख कायम ठेवेल.

### 'त्या' नृत्य शिक्षकाकडून इतर मुलांवर देखील लैंगिक अत्याचार

**वारजे (आरंभ पर्व) :** वारजे माळवाडी भागातील एका नामवंत शाळेतील नृत्य शिक्षकाने 11 वर्षांच्या मुलासह इतर विद्यार्थ्यांवर देखील लैंगिक अत्याचार प्रकार उघडकीस आला आहे. त्याने आणखी किती मुलांच्या बाबतीत हा प्रकार केला याचा पोलिस शोध घेत आहेत. आरोपी शिक्षकावर आत्तापर्यंत दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मंगळवारी हा प्रकार उघडकीस आला असून शिक्षकावर गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे. याबाबत मुलाने तक्रार दिली असून त्यानुसार वारजे माळवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी शैक्षणिक संस्थेत नृत्य शिक्षक म्हणून नोकरी करत आहे. पहिली ते पाचवी इयत्तेमध्ये शिकणाऱ्या मुला-मुलींना नृत्याचे शिक्षण तो देतो. मुलगा अज्ञान असल्याचा फायदा घेऊन सुमारे दोन वर्षांपासून शिक्षक त्याच्याशी अश्लील कृत्य करत आहे. या कृत्याचे मोबाईलमध्ये चित्रीकरण करून मुलाला दाखवून वेळोवेळी त्याच्यावर अत्याचार करत असल्याचे तपासातून पुढे आले आहे.शैक्षणिक संस्थेच्यावतीने समुदेशनासाठी समुपदेशकाची नियुक्ती करण्यात आली आहे. शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना त्यांच्यामार्फत गुड टच व बॅड टच याबाबतची देण्यात येते. गुड टच व बॅड टचच्या प्रशिक्षणात मुलाने त्याच्याबाबत झालेल्या प्रकाराची माहिती दिल्यानंतर ही घटना उघडकीस आली आहे.

## टेनिस व्हॉलीबॉल महाराष्ट्र असोसिएशनची

# नवीन राज्य कार्यकारिणी जाहीर

**सीईओपदी डॉ.व्यंकटेश वांगवाड, अध्यक्षपदी सुरेश रेड्डी क्यातमवार, तर सरचिटणीसपदी गणेश माळवे यांची बिनविरोध निवड**





**पुणे (दै. आरंभ पर्व)**
टेनिस व्हॉलीबॉल महाराष्ट्र संघटनेच्या अध्यक्षपदी सुरेश रेड्डी क्यामतवार यांची तर मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून डॉ व्यंकटेश वांगवाड, कार्याध्यक्ष म्हणून डॉ. आबासाहेब सिरसाठ यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी सरचिटणीस म्हणून गणेश माळवे , कोषाध्यक्ष डॉ दिनेश शिगारम यांची फेरनियुक्ती करण्यात आली. उपाध्यक्ष पदी रामेश्वर कोरडे, आनंद खरे, किशोर चौधरी यांची निवड झाली आहे. दि. 8 डिसेंबर रोजी गंगापूर येथे भारतरत्न मदर टेरेसा इंग्लिश स्कूल येथे पार पडलेल्या टेनिस व्हॉलीबॉल महाराष्ट्र असोसिएशनच्या 2024-28 च्या राज्य कार्यकारी निवड प्रक्रिया समितीच्या बैठकीत पुढील चार वर्षांसाठी नवीन पदाधिकारी यांची निवडणूक घेण्यात आली. खेळाचे जनक डॉ. व्यंकटेश वांगवाड व भारतीय टेनिस व्हॉलिबॉल फेडरेशनचे महासचिव आनंद खरे यांनी निरीक्षक म्हणून काम पाहिले.

महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष म्हणून सुरेशरेड्डी क्यातमवार तर कार्याध्यक्ष म्हणून डॉ. आबासाहेब सिरसाठ यांची निवड करण्यात आली. तसेच सरचिटणीस म्हणून सेलू येथील गणेश माळवे यांची फेरनिवड सर्वानुमते झाली. कोषाध्यक्ष म्हणून डॉ. दिनेश सिंगाराम (पुणे) हे काम बघणार आहेत. उपाध्यक्ष म्हणून किशोर चौधरी (जळगाव), आनंद खरे (नाशिक), रामेश्वर कोरडे (बीड) यांची निवड झाली. तसेच सहसचिव म्हणून रणजित चामले (पुणे), प्रफुल्ल बनसोड (पुणे), प्रशांत कोल्हे (जळगाव), मकरंद कोहळकर (अहिल्यानगर), जयदीप सोनखासकर (अमरावती) मिलिंद कुलकर्णी (सांगली)हे काम पाहणार आहेत. तसेच विभागीय सचिव म्हणून छत्रपती संभाजीनगर विभाग प्रमोद महाजन, पुणे विभाग संतोष खेडे, मुंबई विभाग अशोक शिंदे, नाशिक विभाग किरण घोलप, कोल्हापूर विभाग मिलिंद कुलकर्णी, अमरावती विभाग डॉ. विवेक गुल्हाने, लातूर विभाग डॉ. राहुल वाघमारे यांची निवड करण्यात आली. तसेस प्रा . नंदकिशोर देशपांडे,प्राची कडणे, संजय ठाकरे, उज्वल पाटील यांची कार्यकारणी सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. या सर्व नवनियुक्त पदाधिकारी यांना क्रीडा सहसंचालक सुधीर मोरे, क्रीडा उपसंचालक संजय सबणीस, विजय संतान, आ.मेघना दिदी बोर्डीकर साकोरे, आ. गुलाबराव पाटील, हरीभाऊ लहाने, महाराष्ट्र ऑलिम्पिक सरचिटणीस नामदेव शिरगावकर, आदींनी शुभेच्छा दिल्या आहेत.

### समिती प्रमुखांची निवड करण्यात आली

1)तांत्रिक समिती अध्यक्ष सतिश नावाडे, सचिव: प्रफुल्लकुमार बनसोड (पुणे),सदस्य :- संजय ठाकरे (हिंगोली)
२)रेफरी बोर्ड :अध्यक्ष :- गणेश पाटील (जळगाव)
सचिव :- निलेश माळवे (परभणी)सदस्य :- (.)
३) शिस्तपालन समिती :-
अध्यक्ष:- राजेंद्र महागाडे
सचिव :- अशोक शिंदे (ठाणे)
सदस्य: शिवराज पाळणे (अ.नगर)
4) नियमावली समिती:-
अध्यक्ष:- आशिष ओबेराय (मुंबई शहर)
सचिव :- डॉ दशरथ देशिंगे (सांगली)
५)कार्यक्रम समिती:-
अध्यक्ष :- आनंद खरे (नाशिक) सचिव प्रा. नागेश कान्हेकर, ६) आचार समिती :-अध्यक्ष:-डॉ. रितेश वांगवाड (पुणे),सचिव: सतिश भेंडेकर सदस्य:7)विकास समिती:- अध्यक्ष:- आनंद परतानी (छ. संभाजीनगर) सचिव:- अनिल सोनवणे (जळगाव)
8)लवाद आयोग:-
अध्यक्ष:- विजय संतान (पुणे)
सचिव :- जनट टेकाळे (पुणे)
सदस्य :-
९)महिला समिती :-अध्यक्ष :- नेहा बनसोड (पुणे) सचिव:- मिरा सोळंके (नांदेड)
सदस्य: भावसार प्रगती (पुणे)
10)प्रसिद्धी समिती:- अध्यक्ष :- शिवाजी वाघमारे (परभणी) सचिव: सुधीर भालेराव (छ. संभाजीनगर) सदस्य बाबासाहेब हेलसकर, 11)अ‍ॅथलेट्स कमिशन :- अध्यक्ष: तेजस पाटील (मुंबई सब), सचिव: गणेश कडुले (नाशिक) राहुल पेटकर,(लातूर)

## फिलिपिन्सच्या वैद्यकीय शिक्षणात महत्त्वपूर्ण बदल

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
फिलिपिन्स सरकारने वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून ‘फिलिपिन्स मेडिकल अ‍ॅक्ट’ हे आधुनिक वैद्यकीय शिक्षण सुधारणा विधेयक सादर केले आहे. या विधेयकामुळे भारतीय विद्यार्थ्यांना आता फिलिपिन्समध्ये वैद्यकीय व्यवसाय करण्याचा मार्ग खुला होणार आहे. भारतीय वैद्यकीय विद्यार्थ्यांमध्ये उच्च दर्जाच्या वैद्यकीय शिक्षणाची वाढती मागणी लक्षात घेऊन हे विधेयक आणण्यात आले आहे. या बदलामुळे भारतीय विद्यार्थ्यांच्या उंचावलेल्या आकांक्षांना दिशा मिळणार असून, त्यांना परवडणाऱ्या खर्चात दर्जेदार वैद्यकीय शिक्षणाचा लाभ घेता येणार आहे. प्रतिनिधीगृहात प्रचंड बहुमताने (184-3-0)




मंजूर झालेल्या नवीन कायद्याने 1959च्या जुन्या मेडिकल अ‍ॅक्टची जागा घेतली आहे. या कायद्यात मोठे बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार मेडिकल एज्युकेशन कौन्सिल आणि प्रोफेशनल रेग्युलेटरी बोर्ड ऑफ मेडिसीन स्थापन करण्यात येणार आहे. शैक्षणिक गुणवत्ता उंचावणे, नैतिक मूल्यांचा प्रसार करणे आणि जागतिक वैद्यकीय शिक्षणात फिलिपिन्सचे स्पर्धात्मक स्थान टिकवून ठेवणे, हा या संस्थांचा उद्देश आहे.

## गर्भाशियाच्या मुखाच्या कर्करोगासाठी तपासणीला प्राधान्य

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**
भारतामध्ये दर आठ मिनिटांनी एका महिलेचा गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगामुळे मृत्यू होतो. ही हृदयद्रावक सत्यता परिस्थितीची गंभीरता दर्शवते, कारण गर्भाशयाचा मुखाचा कर्करोग हा महिलांमधील कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यूंचा प्रमुख कारण ठरतो. दरवर्षी 76,000 महिलांचा या रोगामुळे मृत्यू होतो, ज्यामुळे भारतातील महिलांमध्ये हा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वसामान्य कर्करोग ठरतो. हा आजार टाळता येण्यासारखा असूनही, भारतीय जनतेपैकी मोठा भाग गर्भाशियाच्या मुखाच्या कर्करोग आणि त्याच्या जोखमींबाबत अजाण आहे, ज्यामुळे उशिरा निदान होते आणि मृत्यूदर वाढतो.

गर्भाशियाच्या मुखाच्या कर्करोगाचे प्रमुख कारण म्हणजे ह्युमन पॅपिलोमाव्हायरस (HPV) या विषाणूंच्या उच्च-जोखीम प्रकारामुळे होणारा संसर्ग. 200 हून अधिक प्रकारांच्या या विषाणूंपैकी काही प्रकार असामान्य पेशींमध्ये बदल घडवून आणून कर्करोगाला कारणीभूत ठरतात.







भारतामध्ये गर्भाशियाच्या मुखाच्या कर्करोगाचे सर्वाधिक प्रमाण आहे, ज्यामागे अनेक महत्त्वाचे कारणे आहेत. विशेषतः ग्रामीण भागांमध्ये, जागरूकतेचा अभाव आणि आरोग्यसेवा सुविधांपर्यंत पोहोचण्याची अपुरी क्षमता लवकर निदानास अडथळा ठरते. महिलांना लक्षणांबद्दल माहिती नसते आणि ती लक्षणे चुकीच्या पद्धतीने समजली जातात किंवा दुर्लक्षित केली जातात – जसे की संभोगानंतर रक्तस्राव, असामान्य स्त्राव, पोटदुखी, सूज आणि क्रिएटिनिन पातळी वाढणे.

डॉ. निखिल परवते, असोसिएट डायरेक्टर, गायनॅक ऑन्कोलॉजी, अ‍ॅडव्हान्स्ड रोबोटिक सर्जन, आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल म्हणाले, “भारतामध्ये दरवर्षी गर्भाशियाच्या मुखाच्या कर्करोगाचे अंदाजे 1.32 लाख नवीन रुग्ण आढळतात.

चिंताजनक बाब म्हणजे फक्त 18% लोकसंख्येला गर्भाशियाच्या मुखाच्या कर्करोगाबद्दल माहिती आहे, आणि त्याहीपैकी फक्त 4-11% लोकांनी HPV लसीकरण घेतले आहे, जे गर्भाशियाच्या मुखाच्या कर्करोगाच्या 85% प्रकरणे टाळू शकते. जागरूकतेचा अभाव आणि उशिरा निदान या गोष्टी शिक्षण, प्रतिबंध आणि लवकर निदानावर जोर देण्याची गरज निर्माण करतात.”

ग्रामीण भारतामध्ये आरोग्यसेवेच्या सुविधांचा अभाव आहे, ज्यामुळे गर्भाशियाच्या मुखाच्या कर्करोगाचे लवकर निदान आणि प्रतिबंध करण्यात अडचणी येतात. याशिवाय, महिलांना योग्य वयात HPV लस देणे हेही एक आव्हान आहे.



## रविंद्र चव्हाण हे पक्षनिष्ठेचं दुसरं नाव

### भाजपा हीच माझी ओळख आहे - रवींद्र चव्हाण

**यावेळी मंत्रिमंडळात अनेक नविन प्रॉमिसिंग चेहऱ्यांना संधी देताना काही अनुभवी, मातब्बर नेत्यांना मात्र वगळण्यात आलं. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या २-३ दिवसांपासून नाराजीनाट्य सुरु आहे. याला भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यापैकी कुठलाही पक्ष याला अपवाद नाही. उदाहरणच सांगायचं झालं तर सुधीर मुनगंटीवार, संजय कुटे, छगन भुजबळ, तानाजी सावंत, नरेंद्र भोंडेकर अशी अनेक नावं सांगता येतील. त्यामुळेच निवडणुकीपूर्वी एकसंध असणाऱ्या महायुतीमध्ये आता मंत्रिमंडळ आणि खातेवाटपावरून भूकंप होतो का? याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. परंतु या नाराजीनाट्याला अपवाद ठरले आहेत ते देवेंद्र फडणवीस यांचे राइट हँड म्हणून ओळखले जाणारे रविंद्र चव्हाण !**

**(दै. आरंभ पर्व)**
सरकारमधील असो किंवा पक्ष संघटनेच्या दृष्टीने, गेल्या काही वर्षांतील रविंद्र चव्हाण यांची कामगिरी निश्चितच वाखाणण्याजोगी आहे. त्यामुळेच महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीचा जो ऐतिहासिक विजय झाला, त्यामध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या खालोखाल रविंद्र चव्हाण यांचं योगदान आहे, अशी चर्चा झाली. मुख्यमंत्रीपदासाठी देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतीनेच भाजपमधील जी नावं चर्चेत होती, त्या नावांमध्ये रविंद्र चव्हाण यांचं नाव आघाडीवर होतं. मुख्यमंत्रीपदी फडणवीसच हे निश्चित झालं, तेव्हा फडणवीस यांच्या 'सुपर कॅबिनेट' मधील एक निश्चित नाव म्हणून रवींद्र चव्हाण यांच्याकडे पाहिलं जात होतं. पण त्यांना मंत्रिमंडळात कोणतंही स्थान देण्यात आलेलं नाही आणि तरीही रविंद्र चव्हाण यांच्याकडून कुठल्याही प्रकारे नाराजीचा सूर उमटला नाही. नागपूर येथील विधान भवन परिसर, भाजपा विधीमंडळ कार्यालय येथे अनेक मंत्री, नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांच्यासोबत रविंद्र चव्हाण अतिशय खेळीमेळीने वागत आहेत. विशेष म्हणजे एरवी सोशल मीडियाच्या माध्यमातून लोकांशी सतत संपर्कात असणाऱ्या रविंद्र चव्हाण यांच्या सोशल मीडिया अकाउंट्सवर देखील कोणतीही नाराजी दिसून आली नाही. अतिशय शांततेत आधीचा बायो बदलून त्याजागी 'MLA (आमदार), डोंबिवली शहर' इतकंच बायो ठेवण्यात आलं आहे. त्यामुळेच त्यांची ही शांत, संयत भूमिका चर्चेचा विषय ठरली आहे.

छगन भुजबळ यांनी "मी काय तुमच्या हातातलं खेळणं आहे का?" असं म्हणत मनातील खदखद उघडपणे बोलून दाखवली. सुधीर मुनगंटीवार "मी नाराज नाही" असं म्हणत असले तरीही नितीन गडकरी यांच्यासोबतच्या भेटीत नेमकी काय चर्चा झाली हे अजूनही गुलदस्त्यातच आहे.

डॉ. संजय कुटे यांनी सोशल मिडियावर भावनिक पोस्ट टाकत अपमान झाल्याची भावना अप्रत्यक्षपणे बोलून दाखवली आहे. शिवसेना नेते विजयबापू शिवतारे यांनी "अडीच वर्षांनी मंत्रीपद दिलं तरी ते घेणार नाही" अशी टोकाची भूमिका घेतली. नरेंद्र भोंडेकर यांनी तर शिवसेनेच्या पदाचा राजीनामा दिला आहे. तानाजी सावंत यांनी आपल्या फेसबुकच्या डीपिमधून धनुष्यबाण हे चिन्ह काढून टाकलं आहे. मात्र या सगळ्यात रविंद्र चव्हाण समर्थकांनी मात्र कोणतीही भूमिका न घेता शांत राहण्याची भूमिका उठून दिसते आहे.

नेत्यांसोबतच त्यांचे समर्थक देखील आक्रमक झाल्याचे दिसत आहेत. ठिकठिकाणी आपल्या नेत्यांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी, निषेध आंदोलने केली जात आहेत. छगन भुजबळ यांच्या समर्थकांनी अजित पवार यांच्या फोटोला जोडे मारत जोडे मारो आंदोलन केल्याचं देखील पाहायला मिळालं. कुटे यांच्या समर्थकांनी जाब विचारण्यासाठी फडणवीस यांच्या नागपूर येथील निवासस्थानी धडकण्याचा निर्धार केला. याउलट रवींद्र चव्हाण समर्थकांच्या मनात काहीशी नाराजी असली तरीही कुठलीही आक्रमक प्रतिक्रिया दिसली नाही. त्यामुळे स्वतःसोबतच समर्थकांची समजूत काढण्यात देखील रविंद्र चव्हाण यशस्वी झाल्याचं दिसतं.

सध्याच्या काळात पक्षनिष्ठा, तत्त्वनिष्ठा, समाजकारणाचं व्रत या गोष्टी दुर्मिळ होत असल्या तरीही आपल्या या भूमिकेतून चव्हाण यांनी आपण अपवाद असल्याचं दाखवून दिलं आहे. "भाजपा ही माझी ओळख आहे" हे चव्हाण यांचं विधान निवडणुकीच्या काळात चर्चेत आलं होतं, आता या भूमिकेतून हेच वाक्य अधोरेखित झालं आहे. "राष्ट्र प्रथम, त्यानंतर पक्ष आणि शेवटी स्वतः" असं भाजपची विचारधारा सांगते. सध्याच्या काळात संयम बाळगत रविंद्र चव्हाण यांनी आपण या विचारधारेचे बिनचूक पालन करत असल्याचे दाखवून दिले आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.